Vol 5 Issue 10 Nov 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

**Indian Streams Research Journal**
ISSN 2230-7850

Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 10 | Nov - 2015

# एकविसाव्या शतकातील भारतीय शेतीक्षेत्रपुढील आव्हाने

साळवे जे.एम
अर्थशास्त्र विभाग प्रमुख , मु.सा.काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर
ता.बारामती जि-पुणे.

***प्रस्तावना :***

प्राचीन काळापासून भारतीय लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. भारतातील नव्हे तर जगातील अत्यंत पुरातन व्यवसाय म्हणून शेती व्यवसाय केला जातो. २/३ लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६८ टक्के लोक खेडयात राहतात आणि त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. प्राथमिक क्षेत्रातील एक प्रमुख व्यवसाय या नात्याने भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्वाचे स्थान होते आणि आजही आहे. भारतीय लोकांच्या उपजिविकेचे साधन असल्यामुळे शेती हा भारतीय अर्थ व्यवस्थेचा आत्मा आहे. असे राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणत.



साळवे जे.एम

ब्रिटिशांच्या राजवटीत उद्योगधंदे नष्ट झाल्यामुळे शेतीवर उपजिविका करणा-या लोकांचे प्रमाण वाढले .देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात ४३ टक्के वाटा हा शेती उत्पन्नाचा आहे. भारतीय शेती ही लोकांच्या उपजिविकेचे साधन असल्याने, देशाचा आर्थिक विकास आणि प्रगती शेती व्यवसायावर अवलंबून आहे. शेती व्यवसायाला भारतीय अर्थ व्यवस्थेचा कणा म्हटले जाते. शेती ही एक जीवनशैली आहे आणि तिचे जतन करण्यास सरकार कटिवध्द आहे असे भारत सरकारचे कृषी धोरण सांगत असले, तरी भारतात शेती हा मृत्युकडे घेवून जाणारा मार्ग आहे, असे मत रेमन मॅगसेस पुरस्कार विजेते प्राख्यात पत्रकार पी.साईनाथ यांनी मांडले आहे.



स्वातंत्र्यपूर्व काळात शेती विकास विषयक विशेष धोरण अस्तित्वात नसताना शेतीचे स्थान प्रभावी होते. स्वतज्योत्तर काळात भारत सरकारने शेतीला नियोजनात प्राधान्य देऊन शेतीविकास विषयक धोरण राबविल्यामुळे शेती व्ययवसायाचे स्थान बळकट होण्यास हातभार लागला आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान किती महत्त्वाचे आहे. हे पहाणे गरजेचे वाटते.

## भारतीय अर्थव्यवस्थेमधील शतीचे स्थान

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे कमी होत जाणारे महत्त्व एका दृष्टीने आर्थिक विकास दर्शविते, याचाच अर्थ शेतीक्षेत्रावर मर्यादा आणल्या जात आहेत. अर्थव्यवस्थेचा योग्य प्रमाणात विकास होण्यासाठी शेतीचा पुरेशा प्रमाणात विकास होणे आवश्यक असते.

**१)राष्ट्रीय उत्पन्नतील हिस्सा:-**देशातील राष्ट्रीय उत्पन्नातील मोठा वाटा शेती क्षेत्रापासून प्राप्त होतो. १९५०-५१ साली हा वाटा एकूण उत्पन्नाच्या ५६.५ टक्के इतका होता. तो दिवसेंदिवस घटत गेला आहे. यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात महत्वपूर्ण हिस्सा असणारे क्षेत्र म्हणून शेतीला महत्त्व आहे.

**२.रोजगार निर्मीतीचा आधार :-** भारतीय शेती ही रोजगार निर्मितीचा आधार आहे. म्हणून शेतीचे स्थान महत्वाचे आहे. रोजगार उपलब्धता ही मानवासमोरील महत्वाची समस्या आहे. भारतासारख्या जास्त लोकसंख्या असणा-या देशात निर्मी तीला अधिक महत्त्व आहे. लोकांना जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करून देण्याची भूमिका शेती व्यवसायाकडून बजावली जाते.

तसेच कोणत्याही प्रकारचे प्राशिक्षण न घेता रोजगार संधीचा लाभ ग्रामीण भागातील लोकांना देता येतो. १९५०-५१ साली ७० टक्के लोकांना रोजगार उपलब्ध होत होता. आजही ६० टक्कयांपेक्षा जास्त लोक रोजगारासाठी शेतीवर अवलंबून आहेत.

**३. उपजिविकेचे साधन:-** भारतीय लोकांच्या उपजिविकेचे प्रमुख साधन या दृष्टीने शेतीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे समजले जाते. मानवाच्या दैनंदिन जिवनात उपभोगासाठी लागणा-या वस्तुंपैकी म्हणजेच मनुष्याच्या दिनकमानुसार सकाळी चहा, नाष्टा, भोजन ,इतर पदार्थ हे शेती उत्पनातून बनविले जातात. यामुळेच १२० कोटी लोकांच्या उपजिविकेचा आधार म्हणून शेती व्यवसायाकडे आजही पाहीले जाते.

**४ . औद्योगिक विकास :-** आजच्या औद्योगिकीकरणाच्या युगामध्ये औद्योगिक क्षेत्राला आवश्यक असणारा कच्च्या माल पुरवठा करण्याची भूमिका शेती क्षेत्राकडून पार पाडली जाते .

विविध उद्योग शेती उत्पादनावर अवलंबून असतात . उदा . तेलबीया,तंबाखू,कापूस,ऊस,ताग,चहा,कॉफी या सर्व उद्योगांना कच्चा माल शेती क्षेत्रातून पुरवला जातो .

**५ . परकीय चलनाची उपलब्धता :-**भारतीय शेती आजपर्यत परकीय चलन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय व्यापारात सक्रीय सहभागी आहे . स्वातंत्रयपूर्व काळात देखील आपण कापूस, ताग, मसाल्याचे पदार्थ या वस्तू निर्यात करत होतो . आजदेखील या पारंपारिक निर्यातीबरोबरच फळे, फुले, भाजीपाला इत्यादी . शेतमालाची निर्यात होत आहे . म्हणून परकीय चलन मिळवून देण्यासाठी व आंतरराष्ट्रीय व्यापारात मदत करणारे क्षेत्र म्हणून शेती व्यावसायाकडे पाहीले जाते .

**६ . आर्थिक विकासातील भूमिका :-** भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला नियोजनातून व आर्थिक विकासाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे स्थान आहे . शेती क्षेत्रात नियोजित पध्दतीने विकास करून उच्च आर्थिक विकास दर गाठण्यासाठी मदत करत आहेत, म्हणूनच सरकार नियोजित क्षेत्रावर मोठा हिस्सा नियोजनातून शेती क्षेत्रावर खर्च करते . वरील सर्व विवेचनावरून असे दिसून येते की, शेती क्षेत्र किती महत्वाची भूमीका बजावत आहे . म्हणुन शेतीचे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे .

### योजना काळतील शेती विषयक धोरण :-

स्वतंत्र्य पूर्व काळात भारतीय शेती फारशी प्रगत नसली तरी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने या क्षेत्राचे योगदान उल्लेखनीय होते . विशेष म्हणजे कोणत्याही प्रकारचे शेती विषयक धोरण ब्रिटिश सरकार कडून राबविले गेले नव्हते . तरीही चहा, ताग, कपूस, मसाल्याचे पदार्थ यासारख्या शेती वस्तु निर्यात केल्या गेल्या जात . स्वतंत्र्योतर काळात नियोजनामध्ये शेतीला प्राधान्य देऊन शेतीचा दिर्घकालीन विकास घडवून आणण्याचे धोरण सरकारने हाती घेतले आहे . या क्षेत्राचे अर्थव्यस्थेतील महत्व लक्षात घेऊन विविध पंचवार्षिक योजनांमध्ये मोठया प्रमाणावर गुंतवणुक करून शेती व संलग्नित व्यवसायांचा विकास करण्याकडे लक्ष केंद्रित केले . आज-तगायत ज्या १० पंचवार्षिक योजना झाल्या आहेत . त्या योजनांमध्ये शेती व संलग्नित क्षेत्राच्या विकासासाठी सरकारकडून केल्या गेलेल्या खर्चाची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे .

### योजनाकाळातील शेतीवरील सरकारचे धोरण :-

नियोजन काळामध्ये शेतीक्षेत्राचा विकास करण्यासाठी काही व्यापक दीर्घकालीन उदिष्टये समोर ठेवून शेती विकासाचे धोरण राबविण्यात आले .

### उदिष्टये :-

१ . जास्तित जास्त जमीन लागवडीखाली आणणे प्रति हेक्टर उत्पादकतेत वाढ घडवून आणणे .
२ . शेतीक्षेत्रावरील लोकसंख्येचा दिवसेंदिवस दबाव कमी करणे .
३ . शेतीक्षेत्रातून रोजगार उपलब्ध करून ग्रामीण भागातील गरीब कुटुंबाच्या उत्पन्न वाढीस वाव मिळवून देणे .
४ . ग्रामीण भागातील शेतीक्षेत्रामध्ये गुंतलेल्या लोकांच्या उत्पन्नातील विषमता दूर करणे .

वरील सर्व उद्दिष्टये साध्य करण्यासाठी नियोजन काळात शेती विषयक व्यूहरचनेनुसार आजपर्यत पूर्ण झालेल्या विविध पंचवार्षिक योजनांमध्ये शेती विकास विषयक धोरण राबविण्यात आले . सुरवातीच्या तीन पंचवार्षिक योजनांमध्ये अन्नधान्य समस्या सोडवण्यासाठी आणि कच्च्या मालाची उपलब्धता करण्यासाठी शेती विकास आराखडा स्विकारण्यात आला . चौथ्या पंचवार्षिक योजनेत शेती तंत्रज्ञान विकसित व विस्तार करून शेती क्षेत्रात हरितक्रांती घडवून आनण्यांची व्यूहरचना करण्यात आली . चौथ्या आणि पाचव्या पंचवार्षिक योजनाकाळात शेती उत्पादनात वाढ घडवून आनण्याच्या दृष्टीने उपाययोजनांवर भर देण्यात आला . साहव्या पंचवार्षीक योजनेत हरितक्रांती घडवून आणण्यात आली . दहाव्या पंचवार्षिक योजनेत मागील योजना काळातील उणिवा विचारात घेवून राष्ट्रीय शेती विषयक धोरण स्वीकारण्यात आले यावरून आपणास शेतीच्या विकासाच्या दृष्टीने स्वीकारलेल्या दीर्घकालीन धोरणामध्ये झालेले बदल लक्षात येतात .

### भारतीय शेतीक्षेत्रपुढील आव्हाने

**१) उत्पादन क्षमतेत वाढीचे आव्हान :-** भारतीय शेती देशाच्या विकासाबाबत उपजिविकेचे साधन म्हणून महत्त्वाचे आहे . योजनाकाळात भारतीय शेतीची उत्पादकता वाढत आलेली आहे . परंतु आजही पावसावर आवलंबुन असण्या-या शेतीची उत्पादक्ता वाढण्यास वाव आहे . वेगवेगळया प्रदेशामध्ये शेतीची उत्पादकता भिन्न आहे . काही ठिकाणी जास्तीत जास्त पाणी वापराने आज बारमाही ओलीताखालील जमिनीची उत्पादकता घटत चालली आहे .

**२) पाणी पुरवठयाचे व्यवस्थापन :-** शेतीसाठी उपलब्ध असणारे पाणी योग्य दिशेने व पर्याप्त स्वरूपाने वापरण्यासाठी म्हणजेच सर्वत्र सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी जास्त पाणी उपलब्ध असणा-या भागाकडून दुष्काळी भागाकडे नियोजनपुर्वक वळविण्याच्या योजना राबविणे हे एक आव्हानात्मक काम असले तरी आज ते आवश्यक आहे . जागतिक पातळीवरील उपलब्ध पाण्यामधे ४ टक्के पाणी वाटयाला आले आहे . तर एकूण भुभागापैकी २ . ४टक्के क्षेत्र भारताचे आहे . आज भारताच्या एकूण लागवडीखालील क्षेत्रातील ३९टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे . म्हणून शेतक-यांची स्थिती सुधारण्यासाठी भुगर्भातील व जमिनीवरील उपलब्ध पाणी वापरासाठी प्रभावी व्यवस्थापन व अंमलबजावणी होणे गरजेचे आहे . महाराष्ट्र राज्यात देखील विविध प्रकल्पांची निर्मीती असूनही अवघे १९ टक्के क्षेत्र बारामाही ओलीताखाली आले आहे . ही बाब पाणी वापराचे व्यवस्थापन आणि प्रभावी अंमलबजावणीचे द्योतक आहे . ज्या क्षेत्राला मुबलक पाणी आहे . तेथील शेतकरी श्रीमंत आणि ज्या ठीकाणी पाणी नाही त्या ठीकाणचे शेतकरी गरीब आहेत . हा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाकडुन योग्य व आवश्यक उपाययोजना होतील अशी अपेक्षा आहे .

**३) शेती उत्पादनाची विक्री :-** शेती उत्पादनाचे विपणन हे शेती व्यवसायापुढील ज्वलंत स्वरूपाचे आव्हान आहे. शेतमालाला भारतीय बाजारात योग्य भाव मिळत आहे. असे भासत असले तरी प्रत्यक्ष शेतक-याच्या हातात रास्त भाव येत नाही. शेती हा हंगामी व्यवसाय आहे. म्हणून विपणन व्यवस्थेत शेतक-यांनी शेतमाल विक्रीला आणल्यानंतर जास्त आवक झाल्याने किंमती घसरत असतात. याउलट शेतमालाची उपलब्धता म्हणजे आवक कमी असल्यावर शेतमालाच्या किंमती वाढलेल्या असतात. मुळातच भारतीय शेतकी उत्पादनातील विक्रीय वाढावा कमी आसतो. आणि विपणन व्यवस्थेतील उणिवामुळे विक्रीय वाढाण्याचे व्यवस्थापन योग्य प्रकारे करणे शक्य नाही. भारतातील शेतक-यांना शेतमालाच्या विक्रीबाबत सातत्याने बाजारातील गैरप्रकार, बाजार माहितीचा आभाव, किंमतीतील चढउतार, मध्यस्थांची साखळी इ. समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणून शेतमालाला किंमती असूनही शेतक-यांच्या हातात योग्य किंमत पडत नाहीत. अशा अनेक अडचणीमुळे चांगल्या विपणन व्यवस्थेचा योग्य किंमतीच्या स्वरूपातून लाभ घेण्यापासून भारतीय शेतकरी वंचित राहतो.

**४) शेती क्षेत्रशी निगडीत पायाभूत सुविधा करणे :-** शेती क्षेत्राच्या विकासासाठी काही पायाभूत सुविधांची आवश्यक्ता असते. शेती क्षेत्राला काही मुलभूत सुविधा मिळाल्या तर शेतीचा विकास होईल हे एक मोठे आव्हान आहे. शेती क्षेत्राशी निगडीत पायाभूत सुविधांमध्ये रस्ते वाहतूक सुविधा, पतपुरवठा, बाजार व्यवस्था, साठवण गृहे, वीज, दळणवळण यांचा समावेश होतो. या पायाभूत सुविधा वाढविण्यात शासनाची भूमिका महत्त्वाची आहे. परंतू नवीन आर्थिक धोरणाच्या काळात शासनाची कृषी भांडवली गुंतवणुकेचे प्रमाण ३३ टक्के पासून २४ टक्के पर्यत घडलेले आहे. शेतीच्या विकासासाठी यामध्ये वाढ होणे गरजेचे आहे. तसेच विजेचा अपुरा पुरवठा होणे, आवश्यक्तेनुसार व वेळेवर पतपुरवठा न होणे, वाहतुक सुविधा आजही गरजेनुसार न मिळणे, साठवण सुविधा फक्त तालुका स्तरापर्यतच उपलब्ध आहे. म्हणजेच शेती क्षेत्राशी निघडीत पायाभूत सुविधा करण्याचे आव्हान भारतीय शेतीपुढे आहे.

**५. शेती पर्यावरणाचा -हास :-** शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी भारतीय शेतकरी प्रयत्न करीत आहेत. शेती उत्पादकता वाढविण्याच्या प्रयत्नात भारतीय शेतकरी पाणी, खते, किटकनाशके यांचा अमर्यादीत वापर करीत आहे. यामुळे शेतकी पर्यावरणाचा -हास होऊ लागला आहे. शेतीची उत्पादकता कमी होत असून खर्चात वाढ होत आहे. म्हणून शेतीचे अंदाजपत्रक त्रुटीचे होऊ लागले आहे. तसेच शेतीचे शेतीपण नष्ट होत चालले आहे. आजचा शेतीकरी कंपनीर्मित बियाने, खते, किटकनाशके अनियोजित व अशास्त्रीय पध्दतीने वापरत आहे. त्यामुळे मातीचा कस कमी होत आहे. त्याचे संवर्धन करणे हे एक आव्हान आहे.

**६. संशोधन :-** शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी संशोधन वृत्ती वाढीस लागणे गरजेचे आहे. त्यासाठी संशोधन खर्चात वाढ होणे आवश्यक आहे. विकसित देशामध्ये एकूण शेती उत्पादनापैकी २.६ टक्के उत्पादन संशोधनासाठी वापरले जाते. विकसनशील देशातील हे प्रमाण ०.२ टक्के आहे. माती परीक्षण ते नवीन बियाने, किटकनाशके यासाठी होणारे संशोधन आजही बहुतांशी शेतक-यांपासून दूर आहे. म्हणजे संशोधनाचे लाभ शेतक-यांपर्यत गेलेले नाहीत. भारतीय शेतीस सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी संशोधनाचे एक अव्हान आहे. संशोधन हे विविध गोष्टींसाठी होणे आवश्यक आहे. उदा. कोरडवाहू पीक, बियाणे तसेच उत्पादन खर्च कमी करणे या संबधी संशोधन हेणे गरजेचे आहे. मालाची साठवणूक सुविधा, विपणन व्यवस्थेचे संशोधन होऊन ते प्रत्यक्ष शेतक-यांपर्यत पोहचणे आवश्यक आहे. यासाठी खुल्या अर्थव्यवस्येतही भारत सरकारने संरक्षण शेती शिक्षण व शेती या क्षेत्रातील आपला सहभाग वाढविणे गरजेचे आहे.

## सारांश :-

एकविसाव्या शतकामध्ये एक समर्थ्यशाली अर्थव्यवस्था बनविण्यासाठी शेती क्षेत्राचा विकास होण्याच्या दृष्टीने शासनाने प्राधान्याने व प्रामाणिक पणे लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच अर्थव्यवस्थेत वर्तमानकाळातील शेतीपुढील आव्हाने पेलण्याची ताकद निर्माण होणे तितकेच आवश्यक आहे.

शेतीची उत्पादकता केवळ संख्यात्मक दृष्टीने न वाढता गुणात्मक दृष्टीने वाढविणे आवश्यक आहे. केवळ शेतीची उत्पादक्ता वाढवण्यासाठी शेतीची नैसर्गिक शक्ती कमी करणारी उत्पादन तंत्रे वापरणे म्हणजे शेती विकास नसून यामधून अल्पकालीन लाभासाठी दीर्घकालीन नुकसान करण्या-या तंत्राचा वापर न करणे शहाणपणाचे आहे.

पाण्याच्या योग्य व पर्याप्त वापराच्या दृष्टीने सिंचन क्षमता व पध्दती यात सुधारणा होणे गरजेचे आहे. नदया जोड प्रकल्प राबवित असताना या मध्येच थांबलेला नदया जोड प्रकल्प यशस्वीपणे राबवून टप्प्या-टप्प्याने प्रकल्प निर्मिती करून पाण्याची सुविधा उपलब्ध व्हयला हवी.

भारतामधे ६१ टक्के शेती कोरडवाहू आहे. ती कसणारा शेतकरी निरक्षर, अज्ञानी व वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव असणारा आहे याला शिक्षीत, प्रशिक्षीत करण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर स्वातंत्र यंत्रणा निर्माण करणे गरजेचे आहे.

भारतीय शेतीक्षेत्राला सक्षम बनविण्यासाठी शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी विक्रीव्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी कमी कशी होईल याकडे लक्ष दिले पाहिजे तसेच सहकारी वित्तपुरवठयामध्ये ग्रामीण पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटयांच्या प्रगतीकडे व विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच वित्तपुरवठयात सुधारणा करूण शेतक-यांना सावकारी पाशातून काही प्रमाणात मुक्त करण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. सरकारने शेतीक्षेत्रासाठी आवश्यक असणा-या पायाभूत सुविधांच्या निर्मीतीवर भर देवून ग्रामीण बाजारव्यवस्था सबल होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच पर्यावरणाचे असंतुलन निर्माण झाले आहे. वाढण्या-या उद्योगीकरणामुळे प्रदुषणात वाढ होत आहे. यासाठी राष्ट्रीय पातळीवर उद्योगांच्या सहभागातून वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन कर्य होणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींचा बारकाईने विचार केला तर, पर्जन्यमान व पर्यावरण या वर अनुकूल परीणाम होईल आणि शेती क्षेत्र सामर्थ्यशाली व सुजलम-सुफलाम होण्यास हातभार लागेल.

## संदर्भ ः-

१) डॉ. देसाई व डॉ. भालेराव - 'भारतीय अर्थव्यवस्था' -निराली प्रकाशन
२) डॉ. गांगाधर कायंदे पाटील- 'शेतीचे अर्थशास्त्र' -चैतन्य पब्लिकेशन्स नाशिक,१३
३) डॉ. गांगाधर कायंदे पाटील- 'भारतीय अर्थव्यस्था' - चैतन्य पब्लिकेशन्स नाशिक,१३
४) प्रा. डी. एस. कदम,प्रा. आर. के. दातीर,प्रा. आर. एस. चिंतामणी,प्रा. जी. जे. लेमटे भारतीय अर्थव्यवस्था निराली प्रकाशन.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org